# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २५.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २४/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५३,४००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २४/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०२ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ०५.०४ लिटर दारू असा एकुण २,२६०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. २४/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०५ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ५,४७०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द दिनांक २४/०१/२०२३ रोजी पोस्टे हटटा येथे ०१ ठिकाणी कलम ३७९ भादवी सह कलम ४८(७)(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनीयम गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपघाताचे दाखल गुन्हे:—**

दि. २४/०१/२०२३ रोजी पोस्टे गोरेगाव येथे कलम २७९,३०४अ,३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील नमुद मोटारसायकल क्र एमएच ३८ झेड ९९३७ चा चालक यांनी त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी व मयत बसलेल्या मोसा ला पाठीमागुन जोराची धडक मारल्याने फिर्यादी व मयत हे सिमेंट रोडवर पडल्यामुळे मयत १) सुनिल लक्ष्मण चौधरी वय २५ रा बोरी ता जितुंर जि पभणी २) विशाल भरतराव नायक वय ३४ रा सवना ता सेनगाव जि हिंगोली यांचे डोक्यावर गंभीर जख्मा होवुन ते दोघे मरण पावले आहे त्याचे मरणास कारणीभुत झाला व हातापायाला पण मार लागला व फिर्यादीचे डोक्याला चेह—यावर डाव्या हातावर उजव्या पायाला मार लागला आहे मोटार सायकलचे पण नुकसान केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

दुखापत:—

दि. २४/०१/२०२३ रोजी पोस्टे कळमनुरी, वसमत ग्रामीण, हिंगोली शहर येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०३ गुन्हे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४,भादवी कलमान्वये गुन्हे दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.